जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८२७ दिनांक - २२/११/२०२३**

वानवडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

# सिलीगुडी, पश्चिम बंगाल येथून आरोपींना अटक करुन, “ गुन्हयातील रोख २५,३२,००० रुपये जप्त ”

दिनांक १८/१०/२०२३ रोजी जश्न हॉटेल, साळुखे विहार रोड, वानवडी पुणे येथील ऑफीसमधील लोखंडी तिजोरीचे लॉकरमध्ये लॉक करुन ठेवलेले असताना फिर्यादी यांचे सदर हॉटेलमध्ये काम करणारा नोकर नामे महंमद अश्पाक गजेन हुसैन, रा. जिन्नतपुर,(दंगीबस्ती) जेंदाबरी, गोलपोखेर, धरमपूर, उत्तरप्रदेश, सध्या. रा. जश्न हॉटेल, साळुंखे विहार रोड, वानवडी पुणे याने फिर्यादीचे सदरचे २६,५४,०००/- रु रोख रक्कम व ३,००,०००/- रु. कि.चे रोलॅक्स कंपनीचे घड्याळ हे फिर्यादीचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने चोरुन नेले बाबत वानवडी पोलीस स्टेशन येथे भादंवि कलम ३८१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

दाखल गुन्हयाचे अनुषंगाने वानवडी पोलीस स्टेशन गु.र.नं. ५१७/२०२३, भा.दं.वि. कलम ३८१ अन्वये तपास पथक प्रभारी पोलीस उप निरीक्षक संतोष सोनवणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार अतुल गायकवाड_यांना तांत्रिक विश्लेषणावरुन आरोपी हे सिलीगुडी, रा.प.बंगाल येथे असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन सहा.पोलीस फौज राजू रासगे, पोलीस अंमलदार संदिप साळवे, राहूल माने अशी टिम तात्काळ वरिष्ठांचे आदेशाने सिलीगुडी, राज्य पश्चिम बंगाल येथे रवाना झाले. सिलीगुडी येथे स्थानिक पोलीसांचे मदतीने मिळालेल्या तांत्रिक माहितीचे आधारे सापळा रचुन शिताफिने चोरी करणाऱ्या महंमद अश्फाक गजेन हुसैन यास ताब्यात घेण्यात आले. त्याचेकडे अधिक तपास करुन त्याचा आणखीन एक साथीदार यास ताब्यात घेवून त्यांना अटक करण्यात आली.

<u>अटक आरोपीत यांचे नाव खालील प्रमाणे</u>

**१) महंमद अश्फाक गजेन हुसैन,वय ३१ वर्षे,रा.जिन्नतपुर,(दंगीबस्ती) जेंदाबरी, गोलपोखेर, धरमपूर, उत्तर प्रदेश.२)इक्बाल, वय २७ वर्षे, रा. जिन्नतपुर,(दंगीबस्ती) जेंदाबरी, गोलपोखेर, धरमपूर, उत्तरप्रदेश.**

वर नमूद अटक आरोपीत यांचेकडुन चोरीस गेलेल्या रकमेपैकी **<u>२५,३२,०००/- रोख असा मुद्देमाल जप्त करणेत आला</u>** असुन वानवडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ५१७/२०२३, भा.दं.वि.कलम ३८१ प्रमाणे दाखल असलेला गुन्हा उघडकीस आणला आहे. पुढील तपास चालु आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक संतोष सोनावणे, तपास पथक, वानवडी पोस्टे पुणे. हे करत आहेत.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशीक विभाग, पुणे शहर श्री रंजनकुमार शर्मा, मा. पोलीस उपआयुक्त परि.-५, पुणे शहर श्री विक्रांत देशमुख, व मा.सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे शहर श्री शाहुराव साळवे, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री.संजय पतंगे, पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.विनय पाटणकर व तपास पथकातील पोलीस उपनिरिक्षक संतोष सोनवणे, सहा.पोलीस फौज.राजू रासगे, पोलीस अंमलदार हरिदास कदम, अतुल गायकवाड, संदिप साळवे, राहुल माने, विष्णु सुतार, यांनी केली आहे.